संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# या भारतरत्नाने आता कोंदणाला जपावं

एखादा पुरस्कार तो स्वीकारणारी व्यक्ती, पुरस्कार देण्यामागची भूमिका, त्या व्यक्तीचे समाजातील एकूण स्थान या सगळ्या गोष्टींचा विचार करताना नैतिक किंवा सामाजिक मूल्येदेखील तेवढीच महत्त्वाची वाटायला लागतात. अलिकडेच क्रिकेट रसिकांचा आवडता खेळाडू असलेल्या सचिन तेंडुलकरला 'भारतरत्न' या सर्वोच्च सन्मानाने विभूषित केले गेले. हा पुरस्कार राष्ट्रपती प्रणव मुखर्जींच्या हस्ते स्वीकारल्यानंतर सचिनने यापुढेही देशसेवा करीतच राहीन, अशा प्रकारची प्रतिक्रिया दिली. खरे तर त्याच्या क्रीडा क्षेत्रातून तो देशसेवाच करीत आला. भारताचे नाव जगात गाजवण्याचेच काम त्याने केले. स्वत:चे वैयक्तिक विक्रम नोंदवत असताना भारतासाठी एक सशक्त स्थानही त्याने निर्माण केले. त्याच्या क्रीडाक्षेत्रातल्या विक्रमी कर्तृत्वाला सन्मानित करण्यासाठीच हा सर्वोच्च सन्मान त्याला दिला गेला. एवढ्या लहान वयात हा सर्वात मोठा मान मिळवणारा तो एकमेव असावा. आता या पुरस्काराने त्याचा जसा सन्मान झाला आहे तसाच त्याने आता या पुरस्काराचाही मान राखायला हवा. सचिनने हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर अनेक क्रिकेट रसिकांमध्ये, त्याच्या चाहत्यांमध्ये एक चर्चा अशी सुरू झाली आहे की, आता सचिनने कमर्शिअल जाहिराती करू नयेत. एखाद्या मोटरकारची एखाद्या शीतपेयाची किंवा एखाद्या शेव्हिंग क्रीमची जाहिरात करणे यापुढे सचिनला शोभादायक ठरणारे नाही. देशाच्या अतिशय मोठ्या पुरस्काराने तो सन्मानित झाल्यानंतर त्याने अशा केवळ उत्पन्नासाठी पैशासाठी वेगवेगळ्या पोझ देऊन जाहिराती करणे अतिशय अनुचित ठरते. 'भारतरत्न' मिळाल्यानंतर त्याने एखाद्या रत्नासारखा आपला दिमाख ठेवला पाहिजे. ज्यातून या पुरस्काराला जोडलेल्या भारत नावाचा आदर कायम राहील. त्याने क्रिकेट किंवा खेळाशी संबंधित इतर अनेक गोष्टी केल्या तरी हरकत नाही. मग खेळाच्या प्रशिक्षणापासून कॉमेंट्री लेख, अनेक निवड समित्यांवर सदस्य म्हणून किंवा विविध क्रीडा स्पर्धांसाठी मानद सल्लागार म्हणून त्याने आता आपले योगदान दिले पाहिजे. त्याच्या गुणवत्तेचा व क्रीडा नैपुण्याचा, अनुभवाचा देशातल्या तरुणांना किंवा उगवत्या पिढीला उपयोग झाला पाहिजे, असा स्वत:चा आणि त्या सर्वोच्च पुरस्काराचा आदर ठेवून घेण्याचे भान त्याने ठेवायला हवे. पुरस्कारामुळे त्याचा गौरव झाला आहे आणि हा सर्वोच्च पुरस्कार स्वीकारताना त्याच्यावर तेवढी मोठी जबाबदारी आली आहे.

## अन्य पुरस्कार विजेत्यांनीही लक्षात घ्यावे

आपल्या देशाचे दुर्दैव असे की, पुरस्कारासाठी निवड करताना कोणत्याही ठोस निकषांवर दिले जात नाही. पुरस्कारासाठी निवड करतानाच्या काही विशेष बाबींचा विचार होत नाही. ज्यात पुरस्कार स्वीकारलेल्या व्यक्तीने हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्याचा सन्मान टिकून ठेवण्यासाठी काम करावे हेही सांगितले जात नाही. आज जसे सचिनबाबत होत आहे स्वाभाविकपणे त्याने आता वेगळ्या भूमिकेतून या सगळ्या गोष्टींकडे पाहिले पाहिजे. खरे तर केवळ 'भारतरत्न' या एकाच पुरस्काराबाबत नाही तर, भारत सरकारतर्फे अतिशय मानाच्या समजल्या जाणाऱ्या 'पद्मश्री', 'पद्मभूषण' या पुरस्काराबाबतही हाच विचार झाला पाहिजे. ज्याप्रमाणे सचिनसारखा 'भारतरत्न' मोटारकार किंवा शेव्हिंग क्रीम, थम्सअपची जाहिरात करणे योग्य नाही, तोच निकष अभिनेत्यांबाबतही लागू केला पाहिजे. 'पद्मपुरस्कार' मिळालेल्या अभिनेत्याने चित्रपटात व्हिलनचा रोल करून खून, हत्या यांसारख्या भूमिकांना नकार दिला पाहिजे. अन्यथा देशातला हा एवढा मोठा पुरस्कार मिळवायचा आणि त्याच कलावंतांनी अभिनयाच्या नावाखाली समाजाला अनिष्ट ठरणाऱ्या भूमिका करायच्या हे केवळ अयोग्यच नाही तर तो त्या पुरस्काराचा धडधडीत अपमान ठरतो. एखाद्या पद्मश्री मिळवलेल्या नटीने अभिनय करताना केवळ पैशासाठी अंगप्रदर्शन करणे हे योग्य नाही. अनेक संशोधकांना, शास्त्रज्ञांना तर 'पद्मश्री', 'पद्मभूषण' असे दोन दोन पुरस्कार मिळत असतात. तो त्यांच्या अभ्यासाचा संशोधनाचा गौरव असतो. परंतु अशा या समाजाला आदर्श वाटणारे संशोधक असे मोठे पुरस्कार पटकावून जर एखाद्या उद्योगपतींकडे पैशाच्या मोहासाठी मोठ्या पदाच्या खुर्च्या बळकावणार असतील आणि त्या उद्योगपतींकडे, भांडवलदारांकडे चाकरी करणार असतील तर त्या पद्मभूषणला केवढे दूषण ठरेल याचा विचार त्यांनी केलाच पाहिजे. कारण हा पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते देताना सगळा देश त्यांचा सन्मान करीत असतो. परंतु हेच 'पद्मभूषण' मिळवणारे त्या उद्योगपतींपुढे हाजी हाजी करीत राहिले तर त्या पुरस्काराचे महत्त्वाचा संपुष्टात येईल. 'भारतरत्न' घेणारा सचिन आमच्या कारची किंवा शेव्हिंग क्रीमची जाहिरात करतो हे सांगताना त्या कंपनीला निश्चितच फायदा होईल. तेव्हा आता या भारतरत्नाने आपले कोंदण सांभाळावे. हे कोंदण नीट जपले पाहिजे. आपण कुठे शोभून दिसू याचा गांभिर्याने विचार केला पाहिजे.

## पद्मपुरस्कारांचीही खिरापत

अर्थात सचिनला हे भान नक्कीच असू शकेल. कदाचित त्याने 'भारतरत्न' हा पुरस्कार घोषित झाल्यानंतर तशा प्रकारच्या कमर्शिअल जाहिराती करणे बंदही केले असेल. आतापर्यंत त्याला पुरस्कृत सामन्यांची सवय होती. खेळाडूंचे कपडे, मोजे, टोप्या विविध साहित्य वेगवेगळ्या कंपन्यांची नावे झळकत असतात. तर योग्य ती बोली लावून याच खेळाडूंना अनेक कंपन्या विकत घेत असतात. सचिनही असाच आतापर्यंत पुरस्कृत होत होता. आता मात्र तो देशाचा सर्वोच्च पुरस्काराने पुरस्कृत झाला आहे. तीच अपेक्षा 'पद्मश्री', 'पद्मभूषण' आणि 'पद्मविभूषण' पुरस्कार मिळणाऱ्यांकडून ठेवावी लागेल. म्हणूनच हे पुरस्कार देताना सरकारनेसुध्दा खूप विचारपूर्वक दिले पाहिजेत. दुर्दैवाने संबंधित व्यक्तीच्या कर्तृत्वापेक्षा त्याची शिफारस कोणी केली आहे आणि त्याची शिफारस किती अर्थपूर्ण आहे याकडेच पाहिले जाते. यावर्षीच्या पद्मपुरस्काराबाबत असाच प्रकार झाला. राज्य सरकारने दोनच नावांची शिफारस केली होती. त्या दोन्ही नावांना डावलून इतर वीस जणांची जंत्री प्रसिध्द झाली. मग ही नावे आली कोठून? शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या डॉ. विश्वनाथ कराडांना डावलून अभिनयाच्या नावाखाली उत्तानता आणि धिंगाणा घालणाऱ्यांना पद्मश्रीची खिरापत दिली गेली. अशा घाऊक पद्म पुरस्कारांनी त्या पुरस्कारांचाही सन्मान राहत नाही हे राष्ट्रीय स्तरावरच्या या सन्मानांसाठी तेवढ्या सन्माननीय व्यक्ती निवडल्या गेल्या पाहिजेत.